**ठळक बातम्या**

- राज्यात तीस लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर सहा टक्के कर लावण्याचा निर्णय, सरकारने मागे घेतला

- राज्य विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून अण्णा बनसोडे यांची नियुक्ती

- राज्यातल्या सर्व महसूल मंडळांमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महा-राजस्व समाधान शिबिर योजना' सुरू होणार

- बलात्काराच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यासंदर्भात अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या वादग्रस्त आदेशाला सर्वोच्च न्यायालयानं दिली स्थगिती

**आणि**

- खेलो इंडिया पॅरागेम्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या दिनेश बागडे याला पॉवरलिफ्टिंगच्या १०७ किलो वजनी गटाचं सुवर्णपदक

**<><><><><>**

तीस लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर सहा टक्के कर लावण्याचा निर्णय सरकारने घेतला होता, मात्र मंत्रिमंडळात यावर चर्चा होऊन असा कर लावण्याची गरज नाही असा निर्णय झाला. त्यामुळे हा कर लावला जाणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत एका प्रश्नाचे उत्तर देताना सांगितलं. सर्व सरकारी वाहनं तसंच मंत्र्यांची वाहनं टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक करण्यात येतील असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. आमदारांना यापुढे फक्त इलेक्ट्रिक वाहनांसाठीच कर्ज दिलं जाईल असंही त्यांनी सांगितलं.

यूपीएससीच्या धर्तीवर एमपीएससीच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्याचा निर्णय कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नाही असं मुख्यमंत्र्यांनी आज

विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. हा निर्णय २०२२ मध्येच झाला होता, मात्र लगेच अंमलबजावणी करू नये अशी मागणी झाल्यानं याच्या अंमलबजावणीला २०२५ पर्यंत मुदत दिली होती. काही मूठभर शिकवणी वर्ग या विरोधात परीक्षार्थींना फूस लावत आहेत, मात्र ही परीक्षा पद्धती विद्यार्थ्यांच्या हिताची आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. भाजपाचे प्रवीण दरेकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

सरकारच्या विभागांनी आकृतीबंध तयार करून मागणी केल्यानंतर एमपीएससीकडून परीक्षा घेण्यात येते, असं सांगत, दिरंगाई करून कोणत्याही परीक्षार्थींवर सरकार अन्याय करणार नाही, असं मंत्री आशिष शेलार यांनी या प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. पूर्व परीक्षेसाठी देण्यात आलेले ईडब्लूएस आणि एसईबीसीचे पर्याय मुख्य परीक्षेसाठी हे पर्याय लिंकवर उपलब्ध करून देण्यात येतील, तसंच त्यांना एनसीसी प्रमाणपत्र देखील मुलाखतीच्या वेळी ग्राह्य धरलं जाईल, असं शेलार यांनी सांगितलं.

आंबिवली इथल्या इराणी वस्तीत पोलिसांवर हल्ले झाल्या प्रकरणी कोम्बिंग ऑपरेशन राबवलं जाईल, तसंच मकोका लावला जाईल, असं गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितलं. या परिसरात अनधिकृत बांधकामे असतील तर कारवाई केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं. प्रवीण दरेकर, अनिल परब यांनी हा प्रश्न विचारला होता.

भाजपाचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांच्याविरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव विधानपरिषदेत मांडला. कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं गाऊन त्यांचा अपमान केला. त्याचं समर्थन अंधारे यांनी केलं. हा सभागृहाचा अपमान आहे, असं दरेकर म्हणाले. हा प्रस्ताव विशेषाधिकार समितीकडे पाठवल्याचं सभापती राम शिंदे यांनी सांगितलं.

<><><><>

विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून अण्णा बनसोडे यांची नियुक्ती झाल्याची घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज केली. या पदासाठी बनसोडे यांचा एकमेव अर्ज आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आणि सर्व सदस्यांनी एकमताने त्याला मंजुरी दिली. बनसोडे हे आमदार म्हणून तिसऱ्यांदा निवडून आले आहेत.

उत्तराखंडमध्ये झालेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, नवी दिल्लीत झालेल्या खोखो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला आणि पुरुष संघाने मिळवलेले अजिंक्य पदक, आशियाई कबड्डी स्पर्धेत भारतीय महिला संघाने मिळवलेलं विजेतेपद आणि रणजी क्रिकेट स्पर्धेत विदर्भाने मिळवलेल्या विजयाबद्दल विधानसभेने अभिनंदनाचा प्रस्ताव एकमताने मंजूर केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रस्ताव मांडला आणि सभागृहाने तो एकमताने मंजूर केला. विधानपरिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा प्रस्ताव मांडला. सभागृहाने तो एकमताने मंजूर केला.

दिशा सालियन मृत्यूप्रकरणी आदित्य ठाकरे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी शिवसेनेच्या संजय गायकवाड यांनी सभागृहात केली. त्यानंतर सत्ताधारी पक्षाचे सदस्य आक्रमक होऊन गदारोळ झाल्यामुळे कामकाज दहा मिनिटं तहकूब करण्यात आलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी याप्रकरणी तपासात सहकार्य करुन कोणालाही पाठीशी घालणार नाही, असं सांगितलं.

<><><><>

विधान परिषदेच्या सभापतींना पदावरून दूर करण्यासंदर्भातली विरोधी पक्षांच्या सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावाची सूचना मागे घेण्यात आल्याची माहिती या

संदर्भातल्या अधिकृत पत्रकाद्वारे दिली आहे. विरोधी पक्ष नेत्यांचा आणि पक्षाच्या सदस्यांचा सभागृहात हक्क अबाधित राखला जात नसल्याचा आरोप करत विरोधी पक्षनेत्यांनी ही सूचना १९ मार्च रोजी केली होती. परंतु २१ मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सभागृहाचे नेते यांच्याशी झालेल्या सविस्तर चर्चेनंतर ही सूचना मागे घेण्यात आल्याचं प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

राज्यातल्या सर्व महसूल मंडळांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज 'महा-राजस्व समाधान शिबिर योजना' सुरू होत असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानभवन परिसरात माध्यमांशी बोलताना दिली. वर्षातून चारवेळा हे शिबिर लावण्यात येणार असून २५ हजार रुपयांचं अनुदान सरकार देणार असल्याचं ते म्हणाले. या शिबिरात नागरिकांना त्यांच्या तक्रारी मांडता येतील, आणि महसुली मुख्यालयापर्यंत जावं लागणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

अभिनेत्री रुही सिंग यांना इंडियन कॉमिक्स असोसिएशनची प्रादेशिक ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे आणि त्या वेव्हज २०२५ या कार्यक्रमात असोसिएशनचं प्रतिनिधित्व करणार आहेत.

**<><><><>**

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या बलात्काराच्या प्रयत्नाच्या गुन्ह्याशी संबंधित वादग्रस्त आदेशाला सर्वोच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली. या आदेशाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयानं स्वतःहून दखली घेतली आहे. न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांच्या खंडपीठानं उच्च न्यायालयाच्या या मताबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आणि हा आदेश धक्कादायक असल्याचं नमूद केलं. या आदेशाच्या काही भागात संबंधित न्यायाधीशांची असंवेदनशीलता स्पष्टपणे दिसून येत आहे आणि हे अतिशय वेदनादायी आहे, असंही खंडपीठानं म्हटलं आहे.

<><><><><>

वृक्षतोड हा मानवाच्या हत्येपेक्षाही मोठा गुन्हा आहे, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. बेकायदेशीररित्या वृक्षतोड करणाऱ्या व्यक्तीला तोडलेल्या प्रत्येक झाडामागे न्यायालयानं एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या पीठानं हा दंड ठोठावला आहे. एका व्यक्तीनं संरक्षित हरित क्षेत्रातल्या ''ताज ट्रेपेज़ियम झोन' मधली सुमारे ४५४ झाडं कापली होती, त्यानं दाखल केलेली याचिका न्यायालयानं रद्दबातल केली आहे. २०१९ मध्ये न्यायालयानं ताज ट्रेपेज़ियम झोन मधल्या हरित क्षेत्रा बाहेरच्या खाजगी जमिनीवरची झाडं कापायला परवानगी दिली होती तो आदेश देखील सर्वोच्च न्यायालयानं मागे घेतला आहे.

<><><><><>

दिव्यांगांसाठीच्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या दिनेश बागडेने पॉवरलिफ्टिंगच्या १०७ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं आहे. दिव्येश लडानीला रौप्य तर जोगिंदर सिंगला कांस्यपदक मिळालं. ज्येष्ठांच्या ८६ किलो वजनी गटात अरुणमोळी अरुणगिरीला सुवर्ण, प्रभाबेन शियाळला रौप्य तर समीमबेन व्होराला कांस्यपदक मिळालं.

<><><><><>

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत आज राजस्थान रॉयल्स आणि कोलकत्ता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे. गुहाहाटी इथल्या बरसापारा स्टेडियम इथं हा सामना खेळाला जाणार आहे. आज संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यातल्या उल्हासनगर महानगर पालिकेनं २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ९८८ कोटी ७२ लाख रुपयांचा अर्थसंकल्प जाहीर केला. पालिका

आयुक्त मनीषा अहवाले यांनी या अर्थसंकल्पाला मंजूरी दिली आहे. पालिका कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधा प्रस्थापित करणं, पर्यावरण संरक्षण करणं आणि लैंगिक समानता आणणं यावर प्रमुख लक्ष केंद्रित केलं जाणार आहे. हा अर्थसंकल्प पंचसूत्री कार्यक्रमांवर आधारित असल्याचं आयुक्तांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

<><><><><>

नागपूर इथे येत्या 29 आणि 30 मार्च रोजी ‘ऑरेंज सिटी आरोग्य चित्रपट महोत्सव’ आयोजित करण्यात आला आहे. स्मृतिभ्रंश, स्व-मग्नता, मानसिक आरोग्य, अवयवदान, अंमली पदार्थांचे व्यसन, लठ्ठपणा, मद्यपान, पर्यावरण, अंधत्व, महिला आरोग्य समस्या, लैंगिक शिक्षण, कर्करोग, सर्पदंश, स्वच्छता आणि संबंधित सामाजिक समस्या यासारख्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवरचे चित्रपट या महोत्सवात दाखवण्यात येणार आहेत. आरोग्य विषयावर आयोजित होणारा हा मध्य भारतातला पहिलाच चित्रपट महोत्सव ठरणार आहे. कविकुलगुरु कालिदास सभागृह इथे होणाऱ्या या महोत्सवाचं उद्घाटन पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते होणार आहे.

//<><><><><>//